आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक ०३ डिसेंबर २०२५

ठळक बातम्या

1. विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर दरम्यान नागपूरमध्ये, शनिवार आणि रविवारीही कामकाज राहणार सुरू

2. समाज माध्यमांचा दुरुपयोग आणि फेक न्यूज प्रकरणी कठोर कारवाईची गरज असल्याचं केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच लोकसभेत प्रतिपादन

3. राष्ट्रपतींच्या हस्ते 'राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तिकरण पुरस्कार-2025' प्रदान नागपूरच्या अबोली विजय जितना यांना सर्वोत्कृष्ट दिव्यांगजन पुरस्काराने करण्यात आले सन्मानित

4. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा डॉ. मनाली मकरंद क्षीरसागर यांनी स्वीकारला पदभार, विद्यापीठाचे कामकाज तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारदर्शक करण्याचा व्यक्त केला विश्वास

5. एक दिवसीय क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिके विरुद्ध भारताने 359 धावांचे ठेवले लक्ष्य

अधिवेशन

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या ८ डिसेंबरपासून नागपूर इथं सुरूवात होणार आहे. मुंबईत विधानभवन इथं आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली, यात हा निर्णय झाला. हे अधिवेशन १४ डिसेंबरपर्यंत चालेल. १३ डिसेंबर, शनिवारी आणि १४ डिसेंबर, रविवारी शासकीय सुट्टीच्या दिवशीही सभागृहाचं कामकाज होणार आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद सभापती राम शिंदे उपस्थित होते.'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या ऐतिहासिक पर्वानिमित्त दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत 'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन, महाराष्ट्र विधिमंडळ वि.स.

पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक 9 डिसेंबर 2025 रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे, अस विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत सांगितल.

<u>संसद अधिवेशन</u>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी लोकसभेत सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली. समाज माध्यमांचा दुरुपयोग आणि फेकन्यूजचा विषय अत्यंत गंभीर असून या दोन्ही बाबींवर तसंच एआय निर्मित आक्षेपार्ह आशयांवरही कठोर कारवाई करणं गरजेचं आहे, असं केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आज लोकसभेत म्हणाले. प्रश्नोत्तराच्या तासात या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते......

*हमें सोशल मीडिया पर फेक न्यूज पर एआई जनरेटर डीपफेक पर स्ट्रिक्ट एक्शन लेने की जरूरत है। जिस तरह से सोशल मीडिया प्लैटफॉर्म का उपयोग करके एक तरीके से कई ऐसे इको सिस्टम बन गए जो कि भारत के संविधान को फॉलो नहीं करना चाहते हैं। बहुत तरह से इस पार्लियामेंट द्वारा बनाए हुए कानून को भी।पालन नहीं करना चाहते हैं, उसमें स्ट्रीट ऐक्शन लेने की और कड़े नियम बनाने की सख्त जरूरत है।*

देशभरातली जवळपास शंभर टक्के रेशन कार्ड आता डिजिटल रुपात तयार झाल्याची माहिती केंद्रीय अन्न, सार्वजनिक वितरण आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा केला जात असून ही योजना २०२९ पर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती जोशी यांनी यावेळी दिली.

<u>संचार साथी</u>

संचार साथी या **ॲ**पमुळे खासगी आयुष्यात ढवळाढवळ होण्याचा किंवा नागरिकांवर लक्ष ठेवण्याचा कोणताही धोका निर्माण होत नसल्याचं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. उलट, यामुळे फसवणुकीचे प्रकार टाळणं, हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन ब्लॉक करणं, आपल्या नावावरची मोबाईल कनेक्शन तपासून अनधिकृत कनेक्शन रिपोर्ट करणं, मोबाईल हँडसेट खरा आहे किंवा नाही, हे तपासणं इत्यादी गोष्टी करणं नागरिकांना सोपं होईल, असं सरकारनं म्हटलं आहे.दरम्यान या ॲपमधील वापरकर्त्यांना संरक्षण देण्याशिवाय दुसरे कोणतेही कार्य नाही आणि ते त्यांना हवे तेव्हा ॲप काढून टाकू शकतात अस सरकारन स्पष्ट

केल आहे. आतापर्यंत १ पूर्णांक ४ कोटी वापरकर्त्यांनी हे ॲप डाउनलोड केल आहे आणि दररोज २ हजार फसवणुकीच्या घटनांबद्दल माहिती देण्यास हातभार लावत आहेत.

राष्ट्रीय पुरस्कार

ज्या समाजात दिव्यांग व्यक्तींना समानतेची वागणूक दिली जाते, त्याच समाजाला खऱ्या अर्थानं विकसित म्हणता येईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं.दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. दिव्यांग जनांनी विविध क्षेत्रांमध्ये, विशेषतः खेळांमध्ये मिळवलेलं यश म्हणजे सर्वांसाठी प्रेरणास्रोत असल्याचं सांगून गेल्या वर्षीच्या पॅरालिम्पिक्समध्ये २९ पदकं पटकावणाऱ्या भारतीय चमूचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं. महाराष्ट्रातील अनेक व्यक्ती आणि संस्थांनी विविध श्रेणींमध्ये राष्ट्रीय स्तरावर हा सन्मान प्राप्त केला आहे. नागपूरच्या 'अबोली विजय जितना' यांना सर्वोत्कृष्ट दिव्यांगजन पुरस्कारान सन्मानित करण्यात आल. श्रीमती जितना या नागपूरच्या पहिल्या व्हीलचेअर मॉडेल आणि प्रेरक वक्ता म्हणून ओळखल्या जातात. तर, पुण्यातील 'भाग्यश्री मनोहर नादी मित्तला कन्ना' यांना पुरस्कारान सन्मानित करण्यात आल. त्यांनी श्रवण बाधित असूनही कला आणि व्यावसायिक कौशल्य शिक्षिका म्हणून ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केल आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिकमध्ये देशाच प्रतिनिधित्व केल आहे.

कुलगुरु

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या १०२ वर्षांमध्ये पहिल्यांदाच महिला कुलगुरू बनण्याचा मान मिळवणाऱ्या डॉ .मनाली क्षीरसागर यांनी नागपूर विद्यापीठांमध्ये तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करून पारदर्शकतेवर भर देण्याच प्रतिपादन केल. आज कुलगुरू पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर विद्यापीठात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. त्यांनी यावेळी परिक्षांच्या निकालाबाबत माहिती देतांना सांगितल की,

*आता एकदा मी ते अवलोकन करायला लागणार आहे आणि कुठे अक्चुअली गॅप्स आहेत सिस्टीम मध्ये कारण गॅप्स शिवाय असं होणार नाही कुठेतरी गॅप्स असणार आहे त्या आयडेंटिफाय करून त्यांना जर आपण एकदा कव्हर अप केल तर मला असं वाटत आपली जी प्रोसेस आहे ती स्मूथ होणार आणि थोडासा मला माझ्या संगणक अभियांत्रिकाचा मला फायदा होता टेक्नॉलॉजिचा वापर करून काही गोष्टी आपण स्पीड अप करू शकतो आणि मला वाटतं ते इट विल कम एज लिव्हरेज फॉर मी !*

डॉ. क्षीरसागर यांनी पुढे बोलताना सांगितल की, हिवाळी परीक्षा तीन शिफ्टमध्ये आयोजित करत वेळेवर निकाल लावण्याबाबत आढावा घेतला जाणार आहे. हिवाळी परीक्षेतील वेळापत्रक तातडीन प्रकाशित केले जातील. उन्हाळी परीक्षा नियमित वेळेवर होतील असा विश्वास कुलगुरूंनी यावेळी व्यक्त केला. विद्यापीठातील प्रलंबित पदभरतीसाठी आपण शासन स्तरावर पाठ पुरवठा करून चांगल्या मनुष्यबळाच्या पूर्ततेसाठी देखील प्रयत्न करू असं, त्यांनी यावेळी स्पष्ट केलं .विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या ज्ञानाचा अनुभवाचा फायदा विद्यापीठाला मिळण्यासाठी व्याख्यानमाला , प्रयोगशाळांची निर्मिती तसच प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस यासारख्या उपक्रमांमधून माजी विद्यार्थ्यांचा लाभ विद्यापीठाला होईल. या दिशेन देखील विचार केला जाईल असं डॉ. क्षीरसागर यांनी सांगितलं .

<u>पीक विमा</u>

राज्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्यांच्या मदतीसाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. अतिवृष्टी ग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारनं प्रस्तावच पाठवला नसल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. संसदेच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ही बाब उघड झाल्याचा दावाही विरोधकांकडून केला जात होता. मात्र, तारांकित प्रश्न हे ३५ दिवसांपूर्वी दाखल केले जातात, याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधलं आणि कृषीबद्दलचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली. दरम्यान रब्बी हंगामातील पीकासाठी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, पूर, गारपीट, चक्रीवादळ, किटक किंवा रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानापासून संरक्षण देण्यासाठी 'पंतप्रधान पीक विमा' ही योजना राबवण्यात येते. यंदा हरभरा, कांदा, आणि गव्हासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदत आहे. उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग यांसाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मुदत आहे.

<u>क्रिकेट</u>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना छत्तीसगडच्या रायपूर इथं सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारतान फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेसमोर ५ गडी बाद ३५९ धावांच लक्ष ठेवल. विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड यांनी शतक झळकावली तर कर्णधार के. एल. राहुल अर्धशतक करून नाबाद राहिला. या तीन दिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारत 1-0 न आघाडीवर आहे.

## हवामान

आज विदर्भात सर्वात कमी तापमानाची नोंद गोंदिया येथे १० अंश सेल्सिअस करण्यात आली असून नागपूरचे तापमान ११ पूर्णांक ४ अंश सेल्सिअस होते.

*****